# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.02.2025** **वार:शनिवार**

---

1. स्किल इंडिया योजना 2026पर्यंत सुरू ठेवण्याला केंद्रीय मंत्रीमंडळाची मान्यता; आठ हजार 800 कोटी रुपये मंजूर
2. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढाव्यात रेपो दरात पाव टक्के कपात,
3. गडचिरोली येत्या पाच वर्षात देशातील पोलाद निर्मितीचं केंद्र म्हणून उदयाला येईल, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विश्वास
4. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान वाढलेल्या मतदार संख्येची चौकशी करण्याची विरोधी पक्षाच्या नेत्यांची मागणी आणि
5. राज्य शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांना जाहीर

**<u>केंद्रीय मंत्रिमंडळ</u>**

कौशल्य विकासाला चालना देण्याच्या उद्देशानं राबवण्यात येणारी स्किल इंडिया योजना 2026 पर्यंत सुरू ठेवण्याला केंद्रीय मंत्रीमंडळानं मान्यता दिली आहे. या योजनेसाठी 2022-23 ते 2025-26 या वर्षाकरता केंद्रानं आठ हजार 800 कोटी रुपये मंजूर केले आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत प्रसार माध्यमांना ही माहिती दिली. मागणीवर आधारित कौशल्य विकासावर केंद्र सरकारनं लक्ष केंद्रित केलं असून गुणवत्ता वाढीवर भर दिला जाणार असल्याचं वैष्णव म्हणाले. स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाचा कार्यकाळ 31 मार्च 2028 पर्यंत वाढवण्यासही केंद्रानं मान्यता दिली आहे. स्वच्छता कामगारांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि स्वच्छतेच्या कामात सुधारणा करण्यासाठी या निर्णयाचा फायदा होईल असं वैष्णव म्हणाले.

**<u>लोकसभा</u>**

लोकसभेत काल केंद्रीय अर्थसंकल्पावरच्या चर्चेला सुरुवात झाली. हा अर्थसंकल्प देशातील कृषीविषयक आव्हानांना तोंड देण्यात अपयशी ठरला आहे, अशी टीका काँग्रेसचे धर्मवीर गांधी यांनी केली. तर भाजपाचे राव राजेंद्र सिंह यांनी केंद्रीय अर्थसंकल्प हा गरीब, शेतकरी आणि महिलांचं हित जपणार असल्याचं म्हणत त्याचं कौतुक केलं. यानंतर लोकसभेचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<u>रिझर्व्हबँक पतधोरण</u>**

सुमारे पाच वर्षांनंतर भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात पाव टक्का कपात केली आहे. काल जाहीर केलेल्या द्वैमासिक पतधोरणात बँकेनं आधीचा साडेसहा टक्के रेपो दर कमी करुन सव्वासहा टक्के करण्याचा निर्णय जाहीर केला. महागाई कमी झाली आहे आणि 2025-26 या आर्थिक वर्षात ती आणखी कमी होण्याची अपेक्षा असल्यामुळे रेपो दर कपातीचा निर्णय घेतल्याचं बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं. यंदाच्या

आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर 6 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याची शक्यता बँकेनं व्यक्त केली आहे. गेल्या पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत हा दर 6 पूर्णांक 6 दशांश टक्के राहील, अशी शक्यता वर्तवण्यात आली होती.

**औद्योगिक महोत्सव**

गडचिरोलीतील लोह खनिज देशात सर्वात उच्च दर्जाचं असून गडचिरोली येत्या पाच वर्षात देशातील पोलाद केंद्र म्हणून उदयाला येईल असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. नागपूर इथं ॲडव्हांटेज विदर्भ 2025-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. राज्य सरकारच्या पुढाकारानं उद्योग, रोजगार निर्मिती आदींच्या माध्यमातून विदर्भाच्या विकासाला गती मिळाल्याचं गडकरी यांनी यावेळी सांगितलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य मंत्री, खासदार उपस्थित होते. विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये उद्योगपूरक वातावरण निर्माण होत असून गुंतवणूक आकर्षित होऊन नवनवे उद्योग आकाराला येत आहेत आणि रोजगार निर्मितीही होत आहे असं फडणवीस यावेळी म्हणाले. 'ॲडव्हांटेज विदर्भ' मुळे येत्या काळात विदर्भ उद्योगक्षेत्राच्या केंद्रस्थानी येईल, असा विश्वास फडवणीस यांनी व्यक्त केला.

**राहुल गांधी पत्रकार परिषद**

राज्यात विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या वाढल्याच्या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केली आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी काल दिल्लीत या संदर्भात एक पत्रकार परिषद घेतली. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणूकीतल्या आणि राज्यातल्या विधानसभा निवडणुकीतल्या मतदार याद्या केंद्रिय निवडणूक आयोग प्रकाशित करत नसल्याचा आरोप या नेत्यांनी केला. निवडणूक आयोग सर्वच राजकीय पक्षांना सारखंच प्राधान्य देत असून सविस्तर तपशील आणि आकडेवारीच्या तथ्यांसह आम्ही आमचं म्हणणं सादर करू तसंच या आरोपांना लेखी उत्तर देऊ असं निवडणूक आयोगानं या आरोपांना उत्तर देताना म्हटलं आहे.

दरम्यान, राज्यातल्या सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांनी काँग्रेसप्रणित महाविकास आघाडीचे आरोप फेटाळून लावले आहेत. दिल्लीच्या निवडणुकीतला पराभव दिसत असल्यामुळे राहुल गांधी नवी कहाणी तयार करत आहेत अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर इथं केली.

**पुरस्कार**

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत दिला जाणारा 2024 या वर्षासाठीचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक रा रं बोराडे यांना जाहीर झाला आहे. नामवंत प्रकाशन संस्थेसाठीचा श्री. पु. भागवत पुरस्कार पुण्याच्या ज्योत्स्ना प्रकाशन या संस्थेला; डॉक्टर अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डॉ. रमेश सुर्यवंशी यांना आणि मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार भीमाबाई जोंधळे यांना जाहीर झाला आहे. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. मराठी भाषा गौरव दिनी म्हणजे येत्या 27 फेब्रुवारीला मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथं एका दिमाखदार सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचं सामंत यांनी सांगितलं. याशिवाय 2023 या वर्षासाठीच्या विविध श्रेणीतील वाङ्मय पुरस्कारांची घोषणाही काल सामंत यांनी केली.

**<u>परीक्षा पे चर्चा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या सोमवारी सकाळी 11 वाजता परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशभरातले विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. या संवादातून परीक्षेची तयारी, तणाव व्यवस्थापन आणि व्यक्तीमत्व विकास याबाबत पंतप्रधान आपले विचार सादर करतील.

या कार्यक्रमाबाबत आपले विचार मांडताना धनश्री सोळंके ही विद्यार्थीनी म्हणाली...

**हा उपक्रम अतिशय चांगला आहे. जस की सर्व विद्यार्थ्यांना पेपर लिहिताना अतिशय स्ट्रेबस येतो व ते विचार करतात ते पेपर लिहू शकत नाही तर त्याचे जे पण प्रश्न आहेत त्याच उत्तर आपल्याला या कार्यक्रमामार्फत आपल्याला मिळते, आणि जो आपल्याला स्ट्रेबस येतो जे टेन्शन असत जे घरातून सुद्धा मिळत कि एवढेच मार्क पाहिजे तेवढेच पाहिजे हे नसत त्यामुळे हा उपक्रम मला खूप आवडला आहे**.

हर्षाली अढाऊ ही विद्यार्थीनी म्हणाली...

**परीक्षाच्या दिवसात स्ट्रेबस पासून कस दूर राहायचं याच मोदी जी उत्तर देतात, आणि काही मुलांसोबत बोलून त्यांना स्ट्रेबस फ्री करून मोदीजी सगळ्या मुलांना खूप इन्स्पायर करतात.**

सचिन पोटदुखे हे पालक या कार्यक्रमाच्या उपयुक्ततेबद्दल सांगताना म्हणाले......

**एक असा प्रधानमंत्री जो परीक्षा पे चर्चा या विषयावर प्रत्येक विद्यार्थ्या जवळ जाऊन चर्चा करतो, आणि त्या विद्यार्थ्यांना मोटीव्हेट करतो आणि हे खूप मौल्यवान गोष्ट आहे. आणि सध्या च्या घडीला जे डिप्रेशन मध्ये मुल जातात ज्यांना अभ्यासाचा खूप स्ट्रेस येतो, त्यांच्या पाठीमागे कोणीतरी आहे, हे विद्यार्थ्यांना खूप सुखावह वाटेल.**

**<u>अजित पवार</u>**

राज्यातल्या सर्व जिल्ह्यांच्या राज्यस्तरीय वार्षिक योजनांचा आढावा घेतल्यानंतर जिल्हा वार्षिक योजना 2025-26 सर्वसाधारण अंतर्गत प्रत्येक जिल्ह्याला निधी वाढवून देण्यात येईल असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात काल झालेल्या राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेसाठी मंजूर निधी नाविन्यपूर्ण कामावरच खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<u>सोयाबीन खरेदी</u>**

इतर सर्व राज्यांपेक्षा महाराष्ट्रात सोयाबीनची हमी भावानं सर्वात जास्त प्रमाणात करण्यात खरेदी आली असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. 6 फेब्रुवारी पर्यंत 5 लाख 11 हजार 657 शेतकऱ्यांकडून 11 लाख 21 हजार 385 मेट्रीक टन सोयाबीनची खरेदी करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकरी नोंदणीचं प्रमाण विचारात घेऊन खरेदी प्रक्रियेला दोन वेळा मुदतवाढ दिल्याची माहिती पणन विभागानं दिली.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

उत्तराखंडमध्ये देहरादून इथं सुरू असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत, महिलांच्या सांघिक टेनिस प्रकारात महाराष्ट्राच्या संघानं सुवर्णपदक पटकावलं. तीरंदाजीमध्येही पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत राज्याच्या संघानं विजेतेपद मिळवलं. महिलांच्या मुष्टीयुद्ध स्पर्धेच्या 54 किलो गटात दिव्या पवारनं सुवर्णपदक जिंकलं.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**